महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
ई-मेल :- cgmle@mahadiscom.in
फॅक्स नं :- ०२२ - २६५८०६४२

तांत्रिक आस्थापना विभाग
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
प्रकाशगड, ४ था मजला
स्टेशन रोड, वांद्रे (पुर्व)
मुंबई ४०० ०५१.

क्र.साप्रवि मु.म.व्य.(तां.आ)/मपुक/**४४५४** दिनांक : **१०.०२.२०१०**

# परिपत्रक

**विषय: कारागिर "क" (मिटरवाचक /टेलिफोन अटेन्टेड) यांना कनिष्ठ यंत्रचालकाच्या जागा सामावून घेण्याबाबत.**

क्षेत्रिय कार्यालयासाठी नविन कर्मचारी मानकांना कंपनीच्या संचालक मंडळाने दि.१६/०४/२००९ रोजीच्या बेठकीमध्ये मंजूरी दिलेली असून त्यानुसार सविस्तर कार्यालयीन आदेश क्र.४ (पत्र क्र.साप्रवि/मुमव्य(तां.आ.)/मपुक/कर्मचारी मानके/१४६६४ दि. १६/०५/२००९ अन्वये) जारी करण्यात आलेला आहे.

उपरोक्त आदेशात मुद्दा क्र.१३ मध्ये तसेच परिशिष्ट "डी, ई, एफ व जे" मध्ये पदे दाखविताना कारागिर "क" (मिटरवाचक/यंत्रचालक) कारागिर "ब" (मिटरचालक/यंत्रचालक) कारागिर "ब"(मिटरवाचक /यंत्रचालक) असे दाखविण्यात आलेली आहेत. कारण कर्मचारीवृंदाला मंजुरी देताना, कंपनीच्या संचालक मंडळाने या पदांकडून बहुविध पदांच्या भूमिका पार पाडण्याची संकल्पना स्विकृत केली असून या पदावरील कर्मचा-याची गरजेनुसार योग्य त्या जागी सेवा वापरण्यास मान्यता दिलेली आहे.

नागपूर शहर परिमंडलामध्ये कारागिर "क" (टेलिफोन अट) या पदावरील ३४ कर्मचा-यांना, कनिष्ठ यंत्रचालक या पदाच्या जागी सामावून घ्यावे अशा सुचना कार्यकारी संचालक (मा.सं) यांनी त्यांचे पत्र क्र.साप्रवि/मपुक/वराना/३९९१६ दि. ३०/१२/२००९ अन्वये दिलेल्या आहेत. तसेच या कार्यालयाचे पत्र क्र.साप्रवि/मु.म.व्य.(तां.आ./मपुक/वराना/७६१ दि. ०७/०१/२०१० नुसार नागपूर शहर परिमंडलाकडील ३४ कारागिर "क" यांच्या सामावणीच्या संबंधात खालील स्पष्टीकरण दिलेले आहे.

"सर्वच कारागिर "क" (टेलिफोन अटेन्डेट) कर्मचा-यांकडे कनिष्ठ यंत्रचालक पदांची शैक्षणिक अर्हता आहे व ते कनिष्ठ यंत्रालकांचेच काम करित आहेत. त्यामुळे सदरच्या कारागिर "क" या पदावरील कर्मचा-यांचे पदनाम बदलण्याची गरज नसून, नविन सुधारित मानंकाप्रमाणे ते याच पदावर राहून कनिष्ठ यंत्रचालकाची जबाबदारी पार पाडू शकतात.

तथापि विविध क्षेत्रिय कार्यालयात या संबंधात उपरोक्त सूचना प्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे या बाबतीत खालील स्पष्ट सूचना परिपत्रकाद्वारे देण्यात येत आहेत.

१) कनिष्ठ यंत्रचालक आणि कारागिर "क" (मिटरवाचक) कारागिर "क" (टेलिफोन अटेन्डेट) व कारागिर "क" (विद्युत या सर्व पदांवर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांची शैक्षणिक अर्हता एकच आहे आणि संचालक मंडळाने त्यांचेकडून बहुविध पदांची भूमिका पार पाडण्यास मान्यता दिलेली आहे. त्यामुळे ही सर्व पदे समकक्ष असुन त्याची मंडल निहाय एकच जेष्ठता यादी तयार करण्यात यावी अशी सुधारित जेष्ठता यादी करतांना प्रत्येक कर्मचा-यांच्या दि. १६/०५/२००९ या दिवशीच्या स्थितीप्रमाणे सेवाजेष्ठता निश्चित करावी. एकच जेष्ठता यादी तयार करताना त्यांची शैक्षणिक अर्हता आयटीआय इलेक्ट्रीकल हीच असणे अनिवार्य आहे.

२) दिनांक १६/०५/२००९ नंतर या पदासाठी अथवा या पदांच्या वरच्या पदांसाठी निवड समितीची बैठक घेतली असल्यास त्यामध्ये स्थान न मिळाल्यामुळे पदोन्नती न झालेल्या कर्मचा-यांना मानिव तारखेचा लाभ देण्यात यावा.

३) उप केंद्रातील यंत्रचालकाचा उल्लेख यापुढे कारागिर "क" (यंत्रचालक) असा करावा. याच पदावरील कर्मचारी जर मिटर वाचकाचे काम करीत असेल तर त्याचा उल्लेख कारागिर "क" (मिटरवाचक) असा करावा. ज्यांची जेष्ठता यादी एकच राहील व या पदाला कारागिर "क" असे संबोधण्यात येईल कारागिर "क" (विद्युत) आणि कारागिर "क" (टेलिफोन अटेन्डेट) अथवा तत्सम पदे नविन कर्मचारी मानकांमध्ये मंजूर नसल्यामुळे त्या सर्वांना कारागिर "क" (यंत्रचालक) या पदावर सामावून घेण्यात यावे.

४) सेवाजेष्ठता एकत्र करताना जेष्ठता नियमावलीच्या कलम १६ नुसार त्या एकत्र करण्यात याव्यात.

वरील सूचना कारागिर "ब"/सहाय्यक यंत्रचालक आणि कारागिर "अ" /उप यंत्रचालक यांनाही जशाच्या तशा लागू करुन त्यांची सुध्दा एकच सेवाजेष्ठता यादी तयार करावी.

वरील प्रमाणे सूचना विचारात घेवून सर्व मंडल कार्यालयांनी योग्य कार्यवाही त्वरीत करावी व परिपुर्तता अहवाल ३१.०३.२०१० पुर्वी या कार्यालयात सादर करावा.

**कार्यकारी संचालक (मासं)**

**प्रत**

प्रेषण यादीप्रमाणे कंपनी अंतर्गत सर्व संबंधितांना.